RNI No. MAHBIL /2009/31745

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक–मध्य उप-विभाग

वर्ष ९, अंक ५७] शुक्रवार, ऑगस्ट ४, २०२३/श्रावण १३, शके १९४५ [पृष्ठे १२, किंमत : रुपये ४.००

**असाधारण क्रमांक ८६**

**प्राधिकृत प्रकाशन**

### सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ४ ऑगस्ट, २०२३.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण अधिनियम, २०२३.**

क्रमांक संकीर्ण - ११२३/प्र.क्र. ००३/१६-अ.—महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण अधिनियम, २०२३ (सन २०२३ चा अधिनियम क्रमांक २९) याच्या कलम १ च्या पोट-कलम (३) अनुसार प्रदान केलेल्या प्राधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे उक्त अधिनियमातील तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी ४ ऑगस्ट, २०२३ हा दिनांक निश्चित करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रविंद्र गुरव,**
शासनाचे सहसचिव.

**RNI No. MAHBIL /2009/35530**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

**वर्ष ९, अंक २४]** **शुक्रवार, जून ३०, २०२३/आषाढ ९, शके १९४५** **[पृष्ठे ५, किंमत : रुपये २३.००**

**असाधारण क्रमांक ३३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

**सन २०२३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९.—**विवक्षित अत्यावश्यक सेवा आणि समाजातील नेहमीचे व्यवहार चालू ठेवण्याची तरतूद करण्याकरिता, आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम. . . . . . . . . . . . . **पृष्ठे** १-५

दिनांक १९ जून २०२३ रोजी माननीय राष्ट्रपतींनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**सतिश वाघोले,**
सचिव (विधि विधान), महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

**सन २०२३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९.**

(माननीय राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर **" महाराष्ट्र शासन राजपत्रात "** दिनांक ३० जून २०२३ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**विवक्षित अत्यावश्यक सेवा आणि समाजातील नेहमीचे व्यवहार चालू ठेवण्याची तरतूद करण्याकरिता आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** विवक्षित अत्यावश्यक सेवा आणि समाजातील नेहमीचे व्यवहार चालू ठेवण्याची तरतूद करणे इष्ट आहे ; आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे ;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण अधिनियम, २०२३, असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ती, प्रारंभ व कालावधी.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल आणि त्या दिनांकापासून पाच वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, या अधिनियमाचे प्रवर्तन बंद होण्यापूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या गोष्टी वगळता तो अंमलात असण्याचे बंद होईल, आणि त्या अधिनियमाचे प्रवर्तन बंद झाल्यावर जणू काही तो महाराष्ट्र अधिनियमाद्वारे त्यावेळी निरसित करण्यात आला होता असे समजून महाराष्ट्र सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम याचे कलम ७ लागू होईल. १९०४ चा १.

व्याख्या. **२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " अत्यावश्यक सेवा " याचा अर्थ,—

(एक) जिच्या संबंधात राज्य विधानमंडळास कायदे करण्याचा अधिकार आहे अशी, उतारू किंवा माल, जमिनीवरून किंवा पाण्यावरून वाहून नेणारी कोणतीही परिवहन सेवा ;

(दोन) जिच्या संबंधात राज्य विधानमंडळास कायदे करण्याचा अधिकार आहे अशी, गॅस किंवा दूध किंवा पाणी किंवा वीज पुरवठा करण्याच्या संबंधातील कोणतीही सेवा ;

(तीन) रुग्णालये व दवाखाने यांच्यासह, सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता राखण्याच्या संबंधातील कोणतीही सेवा ;

(चार) राज्याच्या कामकाजाच्या संबंधातील कोणतीही सरकारी सेवा, पद आणि नोकरी आणि तसेच राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या सचिवालयीन कर्मचाऱ्यांच्या पदांवर नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्ती, आणि उच्च न्यायालयाचे अधिकारी व कर्मचारी ;

(पाच) स्थानिक प्राधिकरणांच्या कामकाजाशी संबंधित असलेली कोणतीही सेवा किंवा पद ;

(सहा) ज्या बाबींसंबंधी राज्य विधानमंडळास कायदे करण्याचा अधिकार आहे अशा बाबींशी संबंधित असलेल्या ज्या कोणत्याही इतर सेवेतील किंवा पदातील किंवा नोकरीतील किंवा नोकऱ्यांच्या वर्गातील संपामुळे राज्य शासनाच्या मते, कोणतीही सार्वजनिक सुरक्षितता राखण्यास किंवा समाज जीवनास अत्यावश्यक असलेल्या वस्तूंचा पुरवठा व सेवा चालू राहण्यास बाधा पोहोचेल किंवा समाजास गंभीर स्वरूपाच्या अडचणी येतील आणि या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे जी अत्यावश्यक सेवा असल्याचे जाहीर करील अशी कोणतीही इतर सेवा, पद, नोकरी किंवा त्यांचा वर्ग,

असा आहे ;

(ख) " संप " याचा अर्थ, कोणत्याही अत्यावश्यक सेवेत कामावर असलेल्या व्यक्तींच्या गटाने एकत्रितपणे काम बंद करणे किंवा अशा रीतीने ज्या व्यक्ती कामावर असतील किंवा ठेवलेल्या असतील अशा कितीही व्यक्तींनी काम चालू ठेवण्यास किंवा काम स्वीकारण्यास एकविचाराने किंवा एकमताने नकार देणे, असा आहे, आणि त्यात पुढील गोष्टींचा समावेश होईल :—

(एक) कोणतीही अत्यावश्यक सेवा चालू ठेवण्यासाठी अतिकालिक काम करणे आवश्यक असेल त्या बाबतीत असे काम करण्यास नकार देणे ;

(दोन) कोणत्याही अत्यावश्यक सेवेतील काम थांबवण्यात किंवा बऱ्याच प्रमाणात ते कमी होण्यास ज्या कोणत्याही इतर वर्तणुकीची परिणती होण्याचा संभव असेल किंवा होईल अशी कोणतीही इतर वर्तणूक ;

(ग) औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ मध्ये व्याख्या केलेले आणि कलमे ५ व ६ मध्ये वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना त्या अधिनियमामध्ये अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच अर्थ असतील. १९४७ चा १४.

**३.** (१) कलम २ च्या खंड (क) च्या उप-खंड (सहा) अन्वये काढण्यात आलेली प्रत्येक अधिसूचना, ती काढण्यात आल्यानंतर राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असेल तर ताबडतोब व जर त्याचे अधिवेशन चालू नसेल तर सभागृहाच्या पुढील अधिवेशनाचा प्रारंभ होईल तेव्हा पहिल्या दिवशी, त्याच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ती अशा रीतीने ठेवण्यात आल्याच्या तारखेपासून किंवा, यथास्थिति, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा भरल्यापासून चाळीस दिवसांच्या समाप्तीनंतर, त्या मुदतीच्या समाप्तीपूर्वी ती अधिसूचना काढण्यास मान्यता देणारा ठराव राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी संमत केला नसेल तर, अंमलात असण्याचे बंद होईल. अधिसूचना राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवणे.

(२) पोट-कलम (१) द्वारे किंवा तद्न्वये कोणतीही अधिसूचना अंमलात राहण्याचे बंद होईल तेव्हा त्या बाबतीत अशा रीतीने ती अंमलात असण्याचे बंद झाल्यामुळे अशा समाप्तीपूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीस बाधा येणार नाही.

**स्पष्टीकरण.—**राज्य विधानमंडळाच्या सभागृहांचे अधिवेशन निरनिराळ्या तारखांना पुन्हा बोलाविण्यात आले असेल तर त्या तारखांपैकी जी उशिराची तारीख असेल त्या तारखेपासून, ही चाळीस दिवसांची मुदत मोजण्यात येईल.

**४.** (१) कोणत्याही अत्यावश्यक सेवेतील संपास मनाई करणे लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक किंवा इष्ट आहे अशी राज्य शासनाची खात्री पटल्यास, त्यास, पोट-कलम (५) च्या तरतुदींस अधीन राहून सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल त्या तारखेपासून तसे करता येईल. विवक्षित नोकऱ्यांमधील संपास मनाई करण्याचा अधिकार.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला आदेश, त्याच्यामुळे बाधित होणाऱ्या व्यक्तींच्या निदर्शनास आणण्यासाठी राज्य शासनास जी रीत उत्तम वाटेल त्या रीतीने तो प्रसिद्ध करण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला आदेश त्यात विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापासून फक्त सहा महिने अंमलात असेल, परंतु लोकहिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक किंवा इष्ट आहे अशी राज्य शासनाची खात्री पटल्यास, राज्य शासनाला तशाच रीतीने प्रसिद्ध केलेल्या तत्सम आदेशाद्वारे व पोट-कलम (५) च्या तरतुदींच्या अधीन राहून, त्याची मुदत सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल इतक्या आणखी मुदतीकरिता वाढविता येईल.

(४) पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (३) अन्वये एखादा आदेश काढण्यात आल्यानंतर,—

(क) हा आदेश ज्या अत्यावश्यक सेवेस लागू होत असेल त्या कोणत्याही अत्यावश्यक सेवेतील कोणत्याही व्यक्तीने संपावर जाता कामा नये किंवा संपावर राहता कामा नये ;

(ख) अशा सेवेत नोकरीस असलेल्या व्यक्तींनी तो आदेश काढण्यापूर्वी किंवा त्यानंतर जाहीर केलेला किंवा सुरू केलेला कोणताही संप अवैध ठरेल.

(५) (क) विधानपरिषदेचा सभापती आणि विधानसभेचा अध्यक्ष यांच्या विनंतीनुसार असेल ते खेरीज करून, राज्य विधानमंडळाच्या सभागृहांच्या सचिवालयीन कर्मचाऱ्यांच्या पदांवर नियुक्त केलेल्या व्यक्तींच्या बाबतीत ;

(ख) उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश यांच्या विनंतीनुसार असेल ते खेरीज करून, उच्च न्यायालयाचे अधिकारी व कर्मचारी यांच्या बाबतीत,

पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (३) अन्वये कोणताही आदेश काढता येणार नाही.

**५.** (१) आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अत्यावश्यक सेवेशी संबंधित असलेल्या कोणत्याही विवक्षित आस्थापनेतील टाळेबंदीला मनाई करणे लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक किंवा इष्ट आहे अशी राज्य शासनाची खात्री पटल्यास, त्यास, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे तसे करता येईल. विवक्षित आस्थापनांमधील टाळेबंदींना मनाई करण्याचा अधिकार.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला आदेश, त्याच्यामुळे बाधित होणाऱ्या व्यक्तींच्या निदर्शनास आणण्यासाठी, राज्य शासनास जी रीत उत्तम वाटेल त्या रीतीने तो प्रसिद्ध करण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला आदेश फक्त सहा महिने अंमलात असेल, परंतु लोकहिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक किंवा इष्ट आहे अशी राज्य शासनाची खात्री पटल्यास, त्यास, तत्सम आदेशाद्वारे त्याची मुदत सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल इतक्या आणखी मुदतीकरिता वाढविता येईल.

(४) पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (३) अन्वये एखादा आदेश काढण्यात आल्यानंतर,—

(क) कोणत्याही मालकाला, हा आदेश ज्या आस्थापनेला लागू होत असेल त्या आस्थापनेच्या संबंधात, कोणतीही टाळेबंदी जाहीर करता येणार नाही किंवा सुरू करता येणार नाही ;

(ख) कोणत्याही मालकाने हा आदेश ज्या आस्थापनेला लागू होत असेल त्या आस्थापनेच्या संबंधात, हा आदेश काढण्यात येण्यापूर्वी किंवा त्यानंतर जाहीर केलेली किंवा सुरू केलेली, कोणतीही टाळेबंदी अवैध ठरेल.

(५) कोणताही मालक, आस्थापनेच्या संबंधात, या कलमान्वये अवैध असणारी टाळेबंदी सुरू करील, चालू ठेवील किंवा अन्य प्रकारे तिच्या पुरःसरणार्थ वर्तणूक करील तर, त्याला, दोषसिद्धीनंतर सहा महिन्यांच्या मुदतीपर्यंत असू शकेल एवढ्या कारावासाची शिक्षा किंवा तीन हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या दंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील.

विवक्षित आस्थापनांमधील अपरिहार्य कामबंदीला मनाई करण्याचा अधिकार.

**६.** (१) आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अत्यावश्यक सेवेशी संबंधित असलेल्या कोणत्याही आस्थापनेच्या हजेरीपटावर ज्याचे नाव आहे अशा कोणत्याही कामगाराच्या (बदली कामगार किंवा नैमित्तिक कामगार या व्यतिरिक्त) अपरिहार्य कामबंदीला वीज टंचाई किंवा नैसर्गिक आपत्ती यांव्यतिरिक्त अन्य कोणत्याही कारणांमुळे मनाई करणे लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक किंवा इष्ट आहे अशी राज्य शासनाची खात्री पटल्यास, त्यास, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे तसे करता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला आदेश, त्याच्यामुळे बाधित होणाऱ्या व्यक्तींच्या निदर्शनास आणण्यासाठी, राज्य शासनास जी रीत उत्तम वाटेल त्या रीतीने तो प्रसिद्ध करण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला आदेश, फक्त सहा महिने अंमलात असेल, परंतु लोकहिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक किंवा इष्ट आहे अशी राज्य शासनाची खात्री पटल्यास त्यास, तत्सम आदेशाद्वारे त्याची मुदत सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल एवढ्या आणखी मुदतीकरिता वाढविता येईल.

(४) पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (३) अन्वये एखादा आदेश काढण्यात आल्यानंतर,—

(क) कोणताही मालक, आदेश लागू होणाऱ्या कोणत्याही आस्थापनेच्या संबंधात आस्थापनेच्या हजेरीपटावर ज्याचे नाव आहे अशा कोणत्याही कामगाराची (बदली कामगार किंवा नैमित्तिक कामगार यांव्यतिरिक्त) अपरिहार्य कामबंदी, अशी कामबंदी वीज टंचाईमुळे किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे नसेल तर, करणार नाही किंवा चालू ठेवणार नाही आणि अशी कोणतीही अपरिहार्य कामबंदी वीज टंचाईमुळे किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे करण्यात किंवा चालू ठेवण्यात आली नसेल तर, अशी अपरिहार्य कामबंदी करणे किंवा ती चालू ठेवणे अवैध ठरेल ;

(ख) खंड (क) खाली ज्या कामगाराची अपरिहार्य कामबंदी अवैध असेल, त्याला, जणू काही त्याच्यावर अशी अपरिहार्य कामबंदी लादण्यात आली नव्हती असे मानून, त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये दिले जाणारे सर्व लाभ मिळण्याचा हक्क असेल.

(५) आस्थापनेच्या संबंधात कोणत्याही कामगाराची अपरिहार्य कामबंदी करणाऱ्या किंवा चालू ठेवणाऱ्या कोणत्याही मालकास, अशी अपरिहार्य कामबंदी करणे किंवा चालू ठेवणे हे या कलमान्वये अवैध असेल तर, दोषसिद्धीनंतर सहा महिन्यांच्या मुदतीपर्यंत असू शकेल एवढ्या कारावासाची शिक्षा किंवा तीन हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या दंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील.

बेकायदेशीर संपाबद्दल शास्ती.

**७.** या अधिनियमान्वये बेकायदेशीर असलेला संप सुरू करणाऱ्या किंवा अशा कोणत्याही संपावर जाणाऱ्या किंवा राहणाऱ्या किंवा अन्य प्रकारे संपात भाग घेणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस दोषसिद्धीनंतर एक वर्ष मुदतीपर्यंत असू शकेल एवढ्या कारावासाची शिक्षा किंवा तीन हजार रुपयापर्यंत असू शकेल एवढ्या दंडाची शिक्षा दिली जाईल किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील.

चिथावणी देण्याबद्दल शास्ती.

**८.** या अधिनियमान्वये बेकायदेशीर असेल अशा संपास चिथावणी देणाऱ्या, किंवा त्यात भाग घेण्यास इतर व्यक्तींना उद्युक्त करणाऱ्या किंवा अन्यप्रकारे त्याच्या पुरःसरणार्थ वागणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस दोषसिद्धीनंतर एक वर्ष मुदतीपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची किंवा तीन हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या दंडाची शिक्षा दिली जाईल किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील.

बेकायदेशीर संपांना वित्तीय सहाय्य देण्याबद्दल शास्ती.

**९.** या अधिनियमान्वये बेकायदेशीर असलेल्या संपाच्या पुरःसरणार्थ किंवा त्यास पाठिंबा देण्यासाठी जाणूनबुजून जी व्यक्ती कोणताही पैसा खर्च करील किंवा पुरवील तिला दोषसिद्धीनंतर एक वर्ष मुदतीपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची किंवा तीन हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या दंडाची शिक्षा दिली जाईल, किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील.

शिस्तभंगाच्या कारवाईखेरीज कलम ७, ८ किंवा ९ अन्वये करण्यात येणारी कारवाई.

**१०.** कोणतीही व्यक्ती, तिच्या सेवेच्या किंवा नोकरीच्या अटी व शर्तीमुळे शिस्तभंगाच्या स्वरुपातील ज्या कोणत्याही कारवाईला किंवा तिच्या अनुषंगाने होणाऱ्या ज्या कोणत्याही परिणामाला उत्तरदायी होईल त्या कारवाईला किंवा परिणामाला कलम ७, ८ किंवा ९ या अन्वये करण्यात आलेल्या कोणत्याही कारवाईमुळे बाधा पोहोचणार नाही व ती त्यांना अतिरिक्त म्हणून राहील.

अधिपत्राशिवाय (वॉरंट) अटक करण्याचा अधिकार व अपराध अजामीनपात्र असणे.

१९७४ चा २.

**११.** (१) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास एखाद्या व्यक्तीने या अधिनियमाखालील कोणताही अपराध केला आहे असा जिच्याबाबत सकारण संशय वाटत असेल अशा कोणत्याही व्यक्तीस अधिपत्राशिवाय (वॉरंट) अटक करता येईल.

(२) या अधिनियमाखालील सर्व अपराध अजामीनपात्र असतील.

अधिनियम इतर कायद्यांवर अधिभावी असणे.

१९४७ चा ११. १९४७ चा १४.

**१२.** महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियम, औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेला इतर कोणताही कायदा यात, या अधिनियमाच्या किंवा तद्न्वये काढलेल्या कोणत्याही आदेशाच्या तरतुदींशी विसंगत असे काहीही अंतर्भूत असले तरीही, या अधिनियमाच्या तरतुदी किंवा तद्न्वये काढलेले कोणतेही आदेश प्रभावी राहतील.

सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याचे निरसन व व्यावृत्ती.

२०१८ चा महा. १८.

**१३.** (१) महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण अधिनियम, २०१७ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) मुख्य अधिनियमाच्या निरसनाचा पुढील गोष्टींवर परिणाम होणार नाही—

(क) मुख्य अधिनियमाच्या तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा काढलेला आदेश यांसह), किंवा

(ख) मुख्य अधिनियमान्वये संपादित केलेला, उपार्जित केलेला किंवा अंतर्भूत असलेला कोणताही अधिकार, विशेषाधिकार किंवा आबंधने किंवा दायित्व, किंवा

(ग) मुख्य अधिनियमाखाली कोणत्याही अपराधाबाबत कोणतीही लादलेली शास्ती किंवा शिक्षा, किंवा

(घ) उपरोक्तप्रमाणे असा कोणताही अधिकार, विशेषाधिकार, आबंधन, दायित्व, शास्ती किंवा शिक्षा याबाबतचे कोणतेही अन्वेषण, कायदेशीर कार्यवाही किंवा उपाय आणि, असे कोणतेही अन्वेषण, कायदेशीर कार्यवाही किंवा उपाय हे जणू काही मुख्य अधिनियम निरसित करण्यात आलेला नव्हता असे समजून सुरू करता येतील, पुढे चालू ठेवता येतील किंवा लागू करता येतील आणि अशी कोणतीही शास्ती किंवा शिक्षा लादता येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

## GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, Dated the 4th August 2023.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA ESSENTIAL SERVICES MAINTENANCE ACT, 2023.

No. MIS-1123/C.R.003/16-A.—In exercise of the powers conferred by sub-section (*iii*) of section 1 of the Maharashtra Essential Services Maintenance Act, 2023 (Mah. XXIX of 2023), the Government of Maharashtra hereby appoints the 4th day of August 2023, to be the date on which the provisions of the said Act shall come into force.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAVINDRA GURAV,
Joint Secretary to Government.

RNI No. MAHENG /2009/35528

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष ९, अंक ३२] शुक्रवार, जून ३०, २०२३/आषाढ ९, शके १९४५ [पृष्ठे ५, किंमत : रुपये २७.००

असाधारण क्रमांक ४९

**प्राधिकृत प्रकाशन**

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (*3*) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Essential Services Maintenance Act, 2023 (Mah. Act No. XXIX of 2023), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATISH WAGHOLE,

Secretary (Legislation) to Government,
Law and Judiciary Department.

---

**MAHARASHTRA ACT No. XXIX OF 2023.**

(First Published, after having received the assent of the president in the *"Maharashtra Government Gazette"*, on the 30th June 2023).

An Act to provide for the maintenance of certain essential services and the normal life of the community; and to provide for the matters connected therewith or incidental thereto.

WHEREAS it is expedient to provide for the maintenance of certain essential services and the normal life of the community; and to provide for the matters connected therewith or incidental thereto; it is hereby enacted in the Seventy-fourth Year of the Republic of India, as follows :—

**1.** *(1)* This Act may be called the Maharashtra Essential Services Maintenance Act, 2023. Short title, extent, commencement and duration.

*(2)* It extends to the whole of the State of Maharashtra.

*(3)* It shall come into force on such date as the State Government may, by notification in the *Official Gazette*, appoint and shall cease to have effect on the expiry of the five years from the said date except as respects things done or omitted to be done before such cesser of operation of this Act ; and section 7 of the Maharashtra General Clauses Act, shall apply upon such cesser of operation of this Act, as if it had then been repealed by a Maharashtra Act. I of 1904.

Definitions. **2.** In this Act, unless the context otherwise requires, —

*(a)* "essential service" means,—

*(i)* any transport service for the carriage of passengers or goods, by land or water, with respect to which the State Legislature has power to make laws;

*(ii)* any service connected with the supply of gas or milk or water or electricity with respect to which the State Legislature has power to make laws ;

*(iii)* any service connected with the maintenance of public health and sanitation including hospitals and dispensaries;

*(iv)* any public service, post and employment in connection with the affairs of the State and also persons appointed to the secretarial staff of both Houses of the State Legislature, and the officers and employees of the High Court;

*(v)* any service or post in connection with the affairs of the local authorities;

*(vi)* any other service, post, employment or class thereof, connected with matters in respect of which the State Legislature has power to make laws and when the State Government is of opinion that strike in such service, post, employment or class thereof would prejudicially affect the public safety or the maintenance of the supplies or services essential to the life of the community or would result in the infliction of grave hardships on the community, and which the State Government by notification in the *Official Gazette*, declares to be an essential service for the purpose of this Act;

*(b)* "strike" means the cessation of work by a body of persons employed in any essential service acting in combination or a concerted refusal or a refusal under a common understanding of any number of persons who are or have been so employed, to continue to work or to accept employment, and includes,—

*(i)* refusal to work overtime, where such work is necessary for the maintenance of any essential service;

*(ii)* any other conduct, which is likely to result in, or results in, cessation or substantial retardation of work in any essential service;

*(c)* words and expressions used in sections 5 and 6 and not defined herein but defined in the Industrial Disputes Act, 1947, shall have the meanings respectively assigned to them in that Act. 14 of 1947.

Laying of notification before each House of State Legislature.

**3.** *(1)* Every notification issued under sub-clause *(vi)* of clause *(a)* of section 2 shall be laid before each House of the State Legislature, immediately after it is made, if it is in session, and on the first day of the commencement of the next session of the House if it is not in session and shall cease to operate at the expiration of forty days from the date of its being so laid or from the re-assembly of the State Legislature, as the case may be, unless before the expiration of that period, a resolution approving the issue of the notification is passed by both Houses of the State Legislature.

*(2)* Where any notification ceases to operate by or under sub-section *(1)*, the cesser shall be without prejudice to anything done or omitted to be done before such cesser.

*Explanation*.—Where the Houses of the State Legislature are summoned to re-assemble on different dates, the period of forty days shall be reckoned from the later of those dates.

Power to prohibit strike in certain employments.

**4.** *(1)* If the State Government is satisfied that in the public interest, it is necessary or expedient so to do, it may subject to the provisions of sub-section *(5)*, by general or special order, prohibit strike in such essential service from such date as may be specified in the order.

*(2)* An order made under sub-section *(1)* shall be published in such manner, as the State Government considers best calculated to bring it to the notice of the persons affected by the order.

*(3)* An order made under sub-section *(1)* shall be in force for six months only, from the date specified therein, but the State Government may, by a like order published in like manner, and subject to the provisions of sub-section *(5)*, extend it for a further period not exceeding six months, if it is satisfied that in the public interest it is necessary or expedient so to do.

*(4)* Upon the issue of an order under sub-section *(1)* or sub-section *(3)*,—

*(a)* no person employed in any essential service to which the order relates shall go or remain on strike ;

*(b)* any strike declared or commenced whether before or after the issue of the order, by persons employed in any such service shall be illegal.

*(5)* No order under sub-section (*1*) or sub-section (*3*) shall be made in respect of—

*(a)* persons appointed to the secretarial staff of the Houses of the State Legislature, except at the request of the Chairman of the Legislative Council and the Speaker of the Legislative Assembly;

*(b)* officers and employees of the High Court, except at the request of the Chief Justice of the High Court.

Power to prohibit lock-out in certain establishments.

**5.** *(1)* If the State Government is satisfied that in the public interest, it is necessary or expedient so to do, it may, by general or special order, prohibit lock-out in any establishment pertaining to any essential service specified in the order.

*(2)* An order made under sub-section *(1)* shall be published in such manner as the State Government considers best calculated to bring it to the notice of the persons affected by the order.

*(3)* An order made under sub-section *(1)* shall be in force for six months only, but the State Government may, by a like order, extend it for a further period not exceeding six months, if it is satisfied that in the public interest, it is necessary or expedient so to do.

*(4)* Upon the issue of an order under sub-section (*1*) or sub-section (*3*),—

*(a)* no employer in relation to an establishment to which the order applies shall declare or commence any lock-out;

*(b)* any lock-out declared or commenced whether before or after the issue of the order, by any employer in relation to an establishment to which the order applies, shall be illegal.

*(5)* Any employer in relation to an establishment who commences, continues or otherwise acts in furtherance of a lock-out which is illegal under this section, shall, on conviction, be punished with imprisonment for a term which may extend to six months, or with fine which may extend to three thousand rupees, or with both.

Power to prohibit lay-off in certain establishments.

**6.** *(1)* If the State Government is satisfied that in the public interest it is necessary or expedient so to do, it may, by general or special order, prohibit lay-off, on any ground other than shortage of power or natural calamity, of any workman (other than a *badli* workman or a casual workman) whose name is borne on the muster roll of any establishment pertaining to any essential service specified in the order.

*(2)* An order made under sub-section (*1*) shall be published in such manner, as the State Government considers best calculated to bring it to the notice of the persons affected by the order.

*(3)* An order made under sub-section (*1*) shall be in force for six months only but the State Government may, by a like order, extend it for a further period not exceeding six months if it is satisfied that in the public interest it is necessary or expedient so to do.

*(4)* Upon the issue of an order under sub-section (*1*) or sub-section (*3*),—

*(a)* no employer, in relation to an establishment to which the order applies, shall lay-off or continue the lay-off of any workman (other than a *badli* workman or a casual workman) whose name is borne on the muster roll of such establishment, unless such lay-off is due to shortage of power or natural calamity; and any laying off or continuation of laying off shall, unless such laying off or continuation of laying off is due to shortage of power or natural calamity, be illegal;

*(b)* a workman whose laying off is illegal under clause (*a)* shall be entitled to all the benefits under any law for the time being in force as if he had not been laid-off.

*(5)* Any employer in relation to an establishment who lays-off or continues the laying off of any workman shall, if such laying off or continuation of laying off is illegal under this section, on conviction, be punished with imprisonment for a term which may extend to six months, or with fine which may extend to three thousand rupees, or with both.

Penalty for illegal strike.

**7.** Any person who commences a strike which is illegal under this Act or goes or remains on, or otherwise takes part in, any such strike shall, on conviction, be punished with imprisonment for a term which may extend to one year, or with fine which may extend to three thousand rupees, or with both.

Penalty for instigation.

**8.** Any person who instigates or incites other persons to take part in or otherwise acts in furtherance of, a strike which is illegal under this Act, shall, on

conviction, be punished with imprisonment for a term which may extend to one year, or with fine which may extend to three thousand rupees, or with both.

**9.** Any person who knowingly expends or supplies any money in furtherance or support of a strike which is illegal under this Act, shall, on conviction, be punished with imprisonment for a term which may extend to one year, or with fine which may extend to three thousand rupees, or with both. Penalty for giving financial aid to illegal strike.

**10.** Any action taken under section 7, 8 or 9 shall not affect, and shall be in addition to, any action of a disciplinary nature or any consequence which may ensue, and to which any person may be liable by the terms and conditions of his service or employment. Action under section 7, 8 or 9 in addition to disciplinary action.

**11.** *(1)* Notwithstanding anything contained in the Code of Criminal Procedure, 1973, any Police Officer may arrest without a warrant any person who is reasonably suspected of having committed any offence under this Act. Power to arrest without warrant and offences to be non-bailable.

2 of 1974.

*(2)* All offences under this Act shall be non-bailable.

**12.** The provisions of this Act or any order issued thereunder shall have effect notwithstanding anything inconsistent therewith contained in the Maharashtra Industrial Relations Act, the Industrial Disputes Act, 1947 or any other law for the time being in force. Act to override other laws.

XI of 1947. 14 of 1947.

**13.** *(1)* The Maharashtra Essential Services Maintenance Act, 2017 (hereinafter referred to as "the principal Act") is hereby repealed. Repeal of Mah. XVIII of 2018 and saving.

Mah. XVIII of 2018.

*(2)* The repeal of the principal Act shall not affect-

*(a)* anything done or any action taken (including any notification or order issued) under the provisions of the principal Act, or

*(b)* any right, privilege or obligation or liability acquired, accrued or incurred under the principal Act, or

*(c)* any penalty or punishment incurred in respect of any offence under the principal Act, or

*(d)* any investigation, legal proceeding or remedy in respect of any such right, privilege, obligation, liability, penalty or punishment as aforesaid, and any such investigation, legal proceeding or remedy may be instituted, continued or enforced and any such penalty or punishment may be imposed as if the principal Act had not been repealed.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.